# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
(जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)

**वाचा:** १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५
२. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि. १४.०३.२०२०
३. अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक १४.०३.२०२०
४. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७
५. महाराष्ट्र शासन क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०
६. महाराष्ट्र शासन अधिसुचना, No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक १७.०४.२०२०, ०१.०५.२०२०, ०३.०५.२०२०, ०७.०५.२०२०
७. या कार्यालयाचे आदेश (उपचीटनिस) क्र.२०२०/एमएजी/कक्ष-१/कावि- दिनाक:-१९.०४.२०२०, ०३.०५.२०२०
८. या कार्यालयाचे समक्रमांकित आदेश क्र.२०२०/आ.व्य./कावि-५५९ दिनांक:-२६.०४.२०२०

क्र.२०२०/आ.व्य./कावि-५८३ दिनांक:-०८.०५.२०२०

**आदेश :-**

**विषय:** राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत. **(लातूर जिल्हयात अडकलेल्या परराज्यातील/परजिल्हयातील नागरिक ज्यांना स्वगृही जायचे आहे त्यांचे थर्मल स्क्रीनिंग करणे बाबत.)**

ज्याअर्थी संदर्भीय शासन पत्रकान्वये शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. याबाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररीत्या निर्गमित करण्यात आली आहे. त्याअन्वये जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

लातूर जिल्ह्यात अडकलेल्या परराज्यातील/परजिल्हयातील नागरिक ज्यांना स्वगृही जायचे आहे अशा नागरिकांची वैद्यकीय तपासणी करून विहित नमुन्यातील वैद्यकीय प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येत आहेत. सबब संदर्भ क्र. ६ च्या दिनांक ०७.०५.२०२० च्या शासन आदेशान्वये मार्गदर्शक निर्णय घेण्यात आले आहेत.

त्याअर्थी **मी, जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण** लातूर जिल्हयात अडकलेल्या परराज्यातील/परजिल्हयातील नागरिक ज्यांना स्वगृही जायचे आहे अशा नागरिकांसंबंधी वैद्यकीय तपासणीबबत खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

१. लातूर जिल्ह्यात अडकलेल्या परराज्यातील/परजिल्हयातील नागरिक ज्यांना स्वगृही जायचे आहे अशा नागरिकांची वैद्यकीय तपासणी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसाईक यांचेकडून वैद्यकीय प्रमाणपत्र घेण्याची अट शिथिल करण्यात येत आहे.
२. अशा नागरिकांची प्रवासाच्या ठिकाणी फक्त डिजिटल थर्मल स्क्रीनिंग (थर्मल तपासणी) विनाशुल्क करून इंफ्लूएन्झा नाही याची खात्री करून त्यांना रवाना करण्यात यावे. याबाबत अधिष्ठाता, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्था, लातूर, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. लातूर, आरोग्य अधिकारी, म.न.पा. लातूर यांनी समन्वयाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

Phone: (02382-220204, 224001) Fax: (02382-222330)
Website: www.latur.nic.in, E-mail: laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com , ddmolatur@gmail.com

Scanned with CamScanner

**जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय**
**(जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)**

---

३. प्रवास करणा-या सर्व नागरिकांचे डिजिटल थर्मल स्क्रीनिंग (थर्मल तपासणी) विनाशुल्क करून एक सर्वसाधारण यादी तयार करून सर्वांचे त्यांचे थर्मल स्क्रीनिंग झाल्याचे व त्यांना इंफ्लूएन्झा ई. चे लक्षणे नाहीत असे प्रमाणित करावे. प्रत्येक व्यक्तीस स्वतंत्र वैद्यकीय प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता नाही.

या आदेशाचे उल्लंघन केल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१, ५५ तसेच साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये दिलेल्या तरतुदीनुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार तसेच महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२० च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. सदरहू आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

(जी. श्रीकांत) भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण लातूर**

**I] प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर:-**

१. मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद

**II] प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव**

१. पोलीस अधीक्षक, लातूर
२. आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर
३. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. लातूर
४. सर्व उपविभागीय अधिकारी लातूर जिल्हा
५. सर्व तहसिलदार, लातूर जिल्हा
६. जिल्हा माहिती अधिकारी, लातूर
७. जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर
८. जिल्हा आरोग्य अधिकारी, लातूर
९. आरोग्य अधिकारी, म.न.पा. लातूर शहर

Phone: (02382-220204, 224001) Fax: (02382-222330)
Website: www.latur.nic.in, E-mail: laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com , ddmolatur@gmail.com

Scanned with CamScanner